सह्या करुन होतात गायब, प्रभाग कार्यालयात सीसीटीव्हीची मागणी

मनपा कर्मचाऱ्यांची धुळफेक

जळगाव, (वा.) महानगरपालिकेच्या चार प्रभागात प्रशासन कामकाजात भोंगळ कारभार सुरु असून कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत अनेक वाद आहेत. अनेक कर्मचारी मस्टरवर सही करून त्यांच्या खाजगी कामानिमित्त बेपत्ता असतात. यासंदर्भात नगरसेवक अनंत जोशी यांच्यासह अनेकांनी तक्रारी करूनही या कर्मचाऱ्यांना पदाधिकाऱ्यांचा आशिर्वादाने अभय मिळत असून प्रशासन त्यांच्यावर कारवाई करण्यास धजावत नाही. कर्मचारी अनुपस्थितीचे प्रमाण बरेच असल्याने कामकाजावर परिणाम होतो. त्यामुळे चारही प्रभागात सीसीटीव्ही बसविण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल नाटेकर यांनी केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील, जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्था वा शासनाच्या अन्य प्रशासकिय कार्यालयात अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी मस्टर दैनंदिन हजेरी पुस्तक हालचाल रजिस्टर असते. तर बहतांश कार्यालयांमध्ये हजेरी नोंदीसाठी बायोमेट्रीक मशीन वापरात आहेत. त्याचप्रमाणे जळगाव महानगरपालिकेत देखील बायोमेट्रीक मशीन तसेच प्रभाग कार्यालयात मस्टर हजेरी बुक आहे. असे असले तरी बरेचसे कर्मचारी मस्टरवर सहि करून त्यांच्या नियुक्त जागी सापडतील याची खात्री नाही.

गेल्या सहा सात महिन्यात अनेक मनपा कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती संदर्भात महासभेत व अन्य वेळी लेखी तक्रारी आयुक्तांकडे करण्यात आल्या. परंतु बहुतांश कर्मचारी हे पदाधिकाऱ्यांशी संबधीत असल्याने या पदाधिकाऱ्यांच्या दबावाखाली प्रशासनातील अधिकारी कारवाई करण्यास धजावत नाहीत. यातील एका नगरसेवकेचा पती प्रभाग चार मध्ये वॉचमन असून फक्त मस्टरवर सही करून जात असल्याची लेखी तक्रार नगरसेवक अनंत जोशी यांनी केली आहे. या प्रभाग कार्यालयात कामचुकार कर्मचाऱ्यांवर वचक बसावा त्यांच्यावर नियंत्रणासाठी सीसीटीव्ही बसविण्याचीही देखील मागणी यापुर्वी देखील करण्यात आली आहे.

तत्कालीन प्रभारी आयुक्तांनी केली होती कारवाई

मनपाच्या सतरा मजली इमारतीवर किती प्रभाग आहेत. प्रशासनाचे किती अधिकारी व कर्मचारी तसेच आरोग्य विभागात तसेच सफाई आणि अतिक्रमण निर्मूलन विभागात किती कर्मचारी कामावर आहेत. कंत्राटी कर्मचारी किती आहेत. याची मोजदाद नाही. प्रत्यक्ष मस्टरवर असलेल्या पेक्षा बरेचसे कर्मचारी कामावर न येता बेपत्ता असतात. यासंदर्भात तत्कालीन प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी किशोर राजे निंबाळकर यांनी मनपाच्या मुख्या प्रवेशद्दारावरच बैठक मांडून लेटलतीफ व मस्टरवर सह्या करीत बेपत्ता होणाऱ्या कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली होती. या संदर्भात १५९ कर्मचाऱ्यांना लेटलतीफ पणाबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावली होती. तशीच कारवाई मना आयुक्त करतील का? अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

तक्रारदारांचे तोंड केले जाते बंद

- मनपा प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीविषयी ओरड झाल्यास कधीतरी वर्ष-सहा महिन्यातून तोंडी देखली चौकशी न करता तक्रारदारांचे तोंड बंद केले जाते.
- परंतु कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे अनेक नागरिकांची कामे वेळेवर होत नसल्याची तक्रार आहे.
- या कामचुकार सह्या करून दिवसभर बेपत्ता असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रणासाठी कठोर कारवाई करीत सीसीटीव्ही यंत्रणा सर्वच प्रभाग कार्यालयात बसविण्यात यावी अशी मागणी अनिल नाटेकर यांनी मनपा आयुक्त डॉ.विद्या गायकवाड यांच्याकडे केली आहे.

आसोदा गावात दोन अल्पवयीन मुलांचे अपहरण

जळगाव, (वा.) तालुक्यातील आसोदा गावातील दोन अल्पवयीन मुलांचे अपहरण झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यात एक मुलगा १४ वर्षीय तर दुसरा मुलगा हा १५ वर्षांचा आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

जळगाव तालुक्यातील आसोदा गावात अल्पवयीन मुले हे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास आहेत. सोमवार, ५ जून रोजी दोन्ही अल्पवयीन मुले याच परिसरात राहणाऱ्या काका कडे खेळायला गेली, त्यानंतर ती रात्री उशीरापर्यंत घरी परतली नाही, मुलांचा शोध घेतला असता, ती मिळून आली नाही, किंवा त्यांच्याबाबत कुठलीही माहिती मिळाली नाही, कुणीतरी अज्ञात व्यक्तीने कुठल्यातरी आमिषाने मुलांचे अपहरण केल्याची खात्री झाल्यावर मुलाच्या पालकाने मंगळवारी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

या तक्रारीवरुन अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक गणेश सायकर हे करीत आहेत. एकाचवेळी दोन अल्पवयीन मुलांच्या अपहरणाच्या घटनेने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसची आढावा बैठक उत्साहात

जळगाव, (वा.), राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा खा. शरदचंद्रजी पवार यांच्यासह माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, आ. जयंत पाटील यांच्या १६ जुन रोजी अमळनेर दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्याच्या नियोजना संदर्भात आ. अनिल भाईदास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक उत्साहात पार पडली.

यावेळी नवनियुक्त बाजार समिती सभापती तसेच संचालक यांचा सत्कार व १२ जून रोजी प्रशासकीय इमारतीसाठी करण्यात येणाऱ्या उपोषण आंदोलनावर देखील सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व ज्येष्ठ नेते मंडळी, सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, सर्व सेलचे अध्यक्ष व सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती, उपसभापती, संचालक मंडळ, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, शेतकी संघ प्रशासकीय सदस्य मंडळ, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन, व्हॉईस चेअरमन, संचालक मंडळ आदी सर्व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#QUICK NEWS

मोहाडीतून युवकाची दुचाकी लांबविली

जळगाव (वा.) तालुक्यातील मोहाडी गावातील एका तरुणाची २५ हजार रुपये किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या संदर्भात अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, चेतन संजय सोनवणे हा तरुण मोहाडी येथे आपल्या परिवारासह वास्तव्याला आहे.

अधिकारीवर्ग पालकमंत्र्यांच ऐकत नाही: आ. पाटील

अमळनेर, (वा.) तालुक्यातील महसूल व सर्व विभागाची मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या जागेचा विषय सध्या गाजत आहे. या इमारतीबाबत शासकीय अधिकारी इतके मुजोर झाले आहेत की ते पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचेही ऐकत नाही असा टोला आ. अनिल भाईदास पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना लगावला.

प्रशासकीय व महसूल इमारतीस प्रशासकीय मान्यता आणि निधी मंजूर झाला असून नियोजित जागा ही महसूल विभागासाठी देण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्यासह अधिकाऱ्यांच्या बैठकीत पालकमंत्री ना. गुलाबराव पाटलांनी सूचना व आदेश देऊनही इमारतीचे काम सुरू होत नाही, याचा अर्थ पालकमंत्र्यांचे अथवा सरकारचे प्रशासन ऐकत नाही असा होतो. मी अनेकवेळा पालकमंत्र्यांकडे गेलो, त्यांनी अधिकाऱ्यांना फोन लावले असता काही अधिकारी फोन घेत नाही अथवा कामे ऐकत नाहीत. सर्वसामान्य जनतेला बसस्थानकपासून जवळ व एकाच ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकत्र असतील अशी सुविधा होणार आहे.

काँग्रेसभवन जवळून दुचाकी चोरली

जळगाव, (वा.), शहरातील कानळदा रोड श्रीकृष्ण कॉलनी येथे प्रशांत मोहन बडगुजर हे व्यापारी असून नेहमीप्रमाणे ते कामानिमित्ताने ते फुले मार्केट येथे आले होते. यादरम्यान सायंकाळी साडेपाच वाजता त्यांची दुचाकी अज्ञात चोरुन नेली. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, सौ. सविता संतोष सोनवणे व श्री. संतोष पाडुरंग सोनवणे रा. पाटस, ता. दौंड, जि. पुणे यांनी सांगितले वरुन दाखवलेले कागदपत्रांवरून व दिलेल्या माहितीवरून मे. दुय्यम नि. केडगाव / दौंड यांचे हद्दीतील तसेच जि.प.पुणे, तालुका पंचायत समिती, दौंड यांचे हद्दीतील ग्रामपंचायत व गाव मौजे कसबे पाटस ता. दौंड जि. पुणे येथील हद्दीतील ग्रामपंचायत सि.स.नं.७८२/अ/१ क्षेत्र ५५७.६२ चौमी. स. ता. प्रकार -अ याचाच ग्रामपंचायत मिळकत नं. २६४/१/५ (अ.नं. २५६९) मध्ये बांधलेल्या 'सुखकर्ता' या इमारतीमधील फर्स्ट फ्लोअर निवासी सदनिका/फ्लॅट नं.४ (चार) क्षेत्र ३८-३९ चौ. मी. कार्पेट एरिया ही मिळकत या खरेदी दिली असे (सी.टी एस. नं. ७८२/अ/ १/१ सदरची मिलकत नाव- श्री. आनंद सिताराम वाबळे जागा मालक कु.मु.म्हणून व स्वतः करीता कुलस्वामिनी डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) आनंद सिताराम वाबळे वय, ३७ पत्ता पाटस २) सौ. राजश्री विकास गवळी वय-४३, पत्ता- मु. पो. उंडवडी सुपे, ता. बारामती, जि. पुणे यांच्याकडुन फ्लॅट नं. ४ (चार) क्षेत्र ३८.३९ चौ.मी. दि.२९/०३/२०१९ रोजी खरेदी घेतले असून त्याचा दस्त क्र. १४२९/२०१९ हा आहे.

सबब सदरील मिळकतींना वर नमुद कायदेशीर खरेदीस्त नोंद लावायची असुन सदरील मिळकत पुर्णतः निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा अर्जदार यांनी दिलेला आहे. परंतु, सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही, कोणताही प्रकारे काही हक्क, हितसंबंध, वारसा हक्क, अथवा गहाण, दान लीज, लोनसरचार्ज बोजा, बक्षीसपत्र पोटगी विसार पावती, विक्री करारनामा साठेखत अथवा इतर अन्य काही संबंध असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ७ (सात) दिवसांच्या आत कसबे ग्रा. पं. पाटस ता. दौंड जि. पुणे या पत्यावर किंवा खाली नमुद पत्यावर त्याबाबत कायदेशीर कागदपत्राच्या पुराव्यानिशी खात्री पटवुन द्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही काही हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडुन दिले आहेत. तसेच सर्व प्रकारचे कायदेशीर हक्क व अधिकार विद्यामान मालकांना आहेत. असे समजून तसे पत्र देण्यात येईल व अर्जदार हे सदर मिळकतीचे ग्रा.पं. मिळकत पत्रकी वरील खरेदी घेणार यांची नोंद करतील. त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस.

पाटस
दि. ०१/०६/२०२३

सही/-
सौ. सविता संतोष सोनवणे
श्री. संतोष पांडुरंग सोनवणे

फॉर्म ए

जाहीर उद्घोषणा

(इन्सॉल्व्हेन्सी अॅन्ड बँकरप्ट्सी बोर्ड ऑफ इंडिया (कार्पोरेट व्यक्तीकरिता परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अंतर्गत)

परफेक्ट इंजिनीअरिंग प्रोडक्टस लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधून घेण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	परफेक्ट इंजिनीअरिंग प्रोडक्टस लिमिटेड
२.	कॉर्पोरेट ऋणकोची संस्थापन दिनांक	२६.०३.१९६४
३.	प्राधिकारी ज्यांच्याअंतर्गत कॉर्पोरेट व्यक्ती संस्थापित/नोंदणीकृत आहे	आरओसी-मुंबई
४.	कॉर्पोरेट ऋणकोंचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर/ लिमिटेड लाएबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर	U२८९२०MH१९६४PLC०१२८८०
५.	कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व प्रधान कार्यालय (काही असल्यास)	**नोंदणीकृत कार्यालय** : ११०१, विराज टॉवर्स, अंधेरी कुर्ला रोडचा जंक्शन, डब्ल्यू.ई. हायवे, अंधेरी (पू.), मुंबई, महाराष्ट्र- ४०००६९. **कॉर्पोरेट कार्यालय** : प्लॉट क्र. १७२, तुंगार्ली, लोणावळा, जिल्हा पुणे, महाराष्ट्र- ४१०४०३.
६.	कॉर्पोरेट ऋणकोंच्या संदर्भात दिवाळखोरी प्रारंभ दिनांक	दि. ०६.०६.२०२३
७.	परिसमापन ठराव प्रक्रिया समाप्तीची अंदाजित दिनांक	दि. ०३.१२.२०२३
८.	अंतरिम ठराव अधिकारी म्हणून काम करणाऱ्या इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचे नाव व नोंदणीकरण क्रमांक	एआरसीके रिझोल्यूशन प्रोफेशनल्स एलएलपी (आयपी नुसाप आयपीई नोंदणीकरणाप्रमाणे) IBBI/IPE-००३०/IPA-१/२०२२-२३/५००१३ अधिकृत स्वाक्षरीकर्त्याची माहिती : श्री. अनिल कोहली
९.	बोर्डवर नोंदणीकृत म्हणून इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनलचा पत्ता व ई-मेल	पत्ता : फ्लॅट क्र. ४०९, ४ था मजला, अन्सल भवन, १६, के जी मार्ग, कॅनॉट प्लेस, न्यू दिल्ली- ११०००१. ई-मेल : insolvency@arck.in
१०.	अंतरिम ठराव अधिकाऱ्यासह पत्रव्यवहारासाठी वापरावयाचा पत्ता व ई-मेल	पत्ता : फ्लॅट क्र. ४०९, ४ था मजला, अन्सल भवन, १६, के जी मार्ग, कॅनॉट प्लेस, न्यू दिल्ली- ११०००१. ई-मेल : perfectengineering.ibc@gmail.com
११.	दावे सादरीकरणाची अंतिम तारीख	दि. २०.०६.२०२३
१२.	अंतरिम ठराव अधिकाऱ्यांद्वारे निश्चित अनुच्छेद २१ च्या उप-अनुच्छेद (६ए) च्या कलम बी अंतर्गत धनकोंचा वर्ग काही असल्यास	लागू नाही
१३.	वर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी नियुक्त परिसमापन अधिकाऱ्यांची नावे (प्रत्येक वर्गाकरिता तीन नावे)	लागू नाही
१४.	ए) संबंधित फॉर्मे व बी) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील जेथे उपलब्ध आहे	ए)) संबंधित फॉर्मची वेब लिंक : https://ibbi.gov.in.downloadform.html बी) लागू नाही

*एनए - लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरणाने परफेक्ट इंजिनीअरिंग प्रोडक्टस लिमिटेडच्या कार्पोरेट परिसमापन ठराव प्रक्रिया प्रारंभ करण्याचा आदेश दि. ०६.०६.२०२३ रोजी दिला आहे. परफेक्ट इंजिनीअरिंग प्रोडक्टस लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे निर्देश देण्यात येत आहेत की त्यांनी दि. २०.०६.२०२३ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत वरील अ. क्र. १० मध्ये विहित पत्त्यावर अंतरिम ठराव अधिकाऱ्यांकडे त्यांचे दावे सादर करावेत.

वित्तीय धनकोंनी त्यांच्या दाव्यांचे पुरावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. अन्य सर्व धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह व्यक्तिगत स्वरुपात टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत.

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.

अनिल कोहली
नियुक्त भागीदार व अधिकृत स्वाक्षरीकर्ता
एआरसीके रिझोल्यूशन प्रोफेशनल्स एलएलपीचे अंतरिम ठराव अधिकारी
नोंदणीकरण क्र. : IBBI/IPE-००३०/IPA-१/२०२२-२३/५००१३
एएफए वैधता : दि. २२.१२.२०२३ पर्यंत
४०९, अन्सल भवन, १६, के जी मार्ग, (कॅनॉट प्लेस), न्यू दिल्ली-११०००१.
ई-मेल : perfectengineering.ibc@gmail.com
तारीख : ०८.०६.२०२३

चिमुकल्यांनी सादर केले थरारक कौशल्य

किसान वासंतिक शिबिरचा उत्साहात समारोप

भडगाव, (वा.), कर्मवीर तात्यासाहेब हरिरावजी पाटील, किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलीत किसान स्पोर्ट्स अॅकॅडमी आयोजीत किसान समर कॅम्प-२०२३ चा समारोप सहभागी खेळाडूंच्या मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळगाव जिल्हा दुध फेडरेशनच्या संचालिका डॉ. पुनम पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्या वैशाली पाटील, मुख्याध्यापक कमलेश शिंदे, प्राचार्या विद्या पवार आदि उपस्थित होते.

मान्यवरांनी दिली दाद

वासंतिक शिबिरात प्रशिक्षणासाठी निवडण्यात आलेल्या स्केटींगचे प्रात्यक्षिक रंगारंग कार्यक्रमात सहभागी खेळाडूंनी उपस्थित मान्यवरांच्या समोर सादर केले, त्यांचे थरारक कौशल्य बघून मान्यवरांनी तसेच पालकांनीही दाद दिली.

अॅकॅडमीच्यावतीने शिबीरासाठी लाभलेले प्रशिक्षक प्रा. सतीश पाटील, राष्ट्रीय खो-खो पंच प्रा. प्रेमचंद चौधरी, स्केटींग प्रशिक्षक आतिक साटोटे यांचा तसेच संस्थेच्या डॉ. पुनम पाटील यांची भडगाव-पाचोरा कृउबा समितीच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

डॉ. पुनम पाटील यांनी मनोगतातून शिबीरातील सहभागी खेळाडूंचे कौतुक करुन त्यांना घडविणाऱ्या प्रशिक्षकांचे आभार व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक कमलेश शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा. प्रेमचंद चौधरी यांनी केले.

महिलेचे ६० हजारांचे दागिने लांबविले

जळगाव, (वा.), शहरातील टॉवर चौक ते ममुराबाद गावादरम्यान बस प्रवासात महिलेची ६० हजार रुपये किंमतीची सोन्याची चैनसह दागिणे लांबविल्याची घटना मंगळवार, ६ जून रोजी दुपारी साडेबारा ते एक वाजेदरम्यान घडली.

ममुराबाद येथील रहिवासी निर्मला संजय कोळी वय ४८ ह्या मंगळवारी जळगाव शहरात आल्या होत्या. ममुराबाद जाण्यासाठी त्या दुपारी साडेबारा वाजता टॉवर चौक येथून ममुराबाद गावाकडे जाणाऱ्या बसमध्ये बसल्या. ममुराबाद बसस्टॅन्डवर उतरल्यावर निर्मला कोळी यांना त्याच्याकडे असलेली २० ग्रॅमची सोन्याची पोत मिळून आली नाही. बसमध्ये प्रवाशांना विचारला केली, मात्र काहीही माहिती मिळाली नाही.

यावलला भाजपाची आढावा बैठक संपन्न

यावल, (वा.) आगामी काळात होवू घातलेल्या निवडणुकांना लक्षात घेऊन बुथ सशक्तीकरण अभियान अंतर्गत बुथ रचना मजबूत करण्याच्या दुष्टीने रावेर लोकसभा क्षेत्र भाजपाची संघटनात्मक आढावा व नियोजन बैठक आज रोजी यावल येथील श्री महर्षि व्यास मंदिराच्या सभागृह येथे खा. रक्षा खडसे यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाली.या बैठकीत खा. खडसे यांनी उपस्थित भाजपा यावल प्रमुख पदाधिकारी, बुथ प्रमुख व शक्ती केंद्र प्रमुख यांना बुथ सशक्तीकरण तसेच केंद्र व राज्य स्तरावरून पक्षामार्फत आलेल्या विविध आगामी कार्यक्रमा बाबत मार्गदर्शन करून माहिती दिली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष हिरालाल चौधरी, शरद महाजन, नारायण चौधरी, जिल्हा सरचिटणीस हर्षल पाटील, भरत महाजन, नरेद्र नारखेडे, माजी जि.प. सदस्य सविता भालेराव, कांचन फालक, गणेश नेहते, पल्लवी चौधरी, उमेश फेगडे, विलास चौधरी, उज्जैनसिंग राजपूत, डॉ. कुंदन फेगडे, पुरोजीत चौधरी उपस्थित होते.

वटार आगग्रस्तांना डॉ. केतकी पाटील यांचा मदतीचा हात

जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करुन घडविले माणूसकीचे दर्शन

चोपडा, (वा.) तालुक्यातील वटार या गावात गॅसच्या स्फोटामुळे चार कुटूंबावर संकट कोसळले आहे. ही बाब लक्षात घेत घटनास्थळी गोदावरी फाऊंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील यांनी जाऊन आपत्तीग्रस्त कुटूंबियांचे सांत्वन केले. आरोग्य सेवेसाठी मदतीचा हात पुढे केला. या कुटूंबियांच्या जीवनाची घडी पूर्ववत बसावी याकरीता आपल्या टिमला पाठवून जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करुन सामाजिक बांधिलकी जोपासली.

वटार या गावी दोन आठवड्यांपुर्वी गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन गावच्या सरपंच भिकुबाई सुभाष कोळी, कैलास भिका कोळी, पांडुरंग सुभाष ठाकरे, धनसिंग खंडू ठाकरे या चार कुटुंबीयावर मोठा आघात झाला. या स्फोटात त्यांची घरे जळून खाक होत खूप मोठी वित्तहानी झाली. अशा परिस्थितीत गोदावरी फाउंडेशनच्या संचालिका डॉ. केतकी पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन आपत्तीग्रस्त परिवाराचे सांत्वन केले. याप्रसंगी आरोग्य समस्यांबाबत मदतीचा हातही त्यांनी पुढे केला. डॉ. केतकी पाटील यांनी ७ जून रोजी भारत वाळके, किशोर महाजन, जगदीश पाटील, खुशाल पंढरीनाथ पाटील, बाळू दगडू ठाकरे यांना वटार गावात पाठवले.

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work. **Tender No.:** EE/PCDN/Tech/06/2023-24 **RFx No. 7000027621 Work:** Work of renovation of Sub-Station Earthing at 220kV Chinchwad-I substation under EHV O&M Pimpri Chinchwad Division, Pune. **Tender Amount:** Rs. 21,22,325/- **EMD:** Rs. 21,223/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Download of Tender Documents:** From 07.06.2023 to 14.06.2023 up to 18:00 Hrs. **Bid Opening**: 15.06.2023 after 10:00 Hrs **(Tech Bid);** 16.06.2023 after 10:00 Hrs **(Price Bid).**
For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in** and open **above RFx** for downloading tender documents, schedules & annexures.

Sd/-
Executive Engineer (Charge)
EHV O&M Division, Pimpri Chinchwad

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following work.
Tender No: - SE/EHV/O&M/Circle/Pune/T-11/2023-24 **RFx No. 7000027540**
Subject: Extension to Closing Date for Re-E-Tender for Work of Servicing & Overhauling of Siemen's make 132KV CB at various Substations under EHV O&M Circle, Pune. **Tender Amount:** Rs. 98,22,848.2 **EMD:** Rs. 98,228/- **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Download of Tender Documents Extended up to:** 12.06.2023 up to 16:00 Hrs. **Bid Opening:** 12.06.2023 after 16:00 Hrs **(Tech. Bid)**; 16.06.2023 after 11:00 Hrs **(Price Bid).**
For further details, visit our website **https://mahatransco.in** and open **above RFx** for downloading tender documents, schedules and annexures.

Sd/-
Superintending Engineer
EHV O&M Circle, Pune

पुणे महानगरपालिका

भवन रचना विभाग
निविदा प्रक्रिया कक्ष
निविदा जाहिरात - नविन कामे

१) ई-निविदा विक्री कालावधी :- ०८/०६/२०२३ दुपारी २.३० वाजेनंतर ते १७/०६/२०२३ दुपारी २.३० वाजेपर्यंत
२) निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ :- ०८/०६/२०२३ दुपारी २.३० वाजेनंतर ते १७/०६/२०२३ दुपारी २.३० वाजेपर्यंत
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक :- १९/०६/२०२३ दुपारी ३.०० वाजेनंतर

जाहिरात क्र. १/२२५ दि. ७/६/२०२३

अ. क्र.	निविदा क्र.	खात्याचे नाव	कामाचे नाव	एकूण निविदा रक्कम	बयाणा रक्कम	कामाची मुदत	निविदा संच रुपये	निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव
१	पी.एम.सी./भवन/ १७/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रामधील दमोदरनगर हिंगणे खुर्द येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेसाठी दुरुस्ती विषयक कामे करणे.	१९५१७८८	१९५१८	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	१३५९	श्री. रामदास कडू ९६८९९३१४३४
२	पी.एम.सी./भवन/ १८/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कोढवे धावडे (जुने ग्रामपंचायत कार्यालय) येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेसाठी दुरूस्ती विषयक कामे करणे.	१७२६६९४	१७२६७	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	१३५९	श्री. रामदास कडू ९६८९९३१४३४
३	पी.एम.सी./भवन/ १९/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कोपरे येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेसाठी दुरूस्ती विषयक कामे करणे.	१९४९४०४	१९४९४	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	१३५९	श्री. रामदास कडू ९६८९९३१४३४
४	पी.एम.सी./भवन/ २०/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रातील स. नं. २४ विश्रांतीनगर विठ्ठलवाडी येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेसाठी दुरूस्ती विषयक कामे करणे.	१९७४१३६	१९७४१	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	१३५९	श्री. रामदास कडू ९६८९९३१४३४
५	पी.एम.सी./भवन/ २१/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रातील शिवणे (जुने ग्राम पंचायत कार्यालय) येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेसाठी दुरूस्ती विषयक कामे करणे.	१०८६१५४	१०८६२	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	७६९	श्री. रामदास कडू ९६८९९३१४३४
६	पी.एम.सी./भवन/ २२/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रामधील जुने म्हाळुंगे ग्रामपंचायत कार्यालय येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेकामी दुरुस्ती विषयक कामे करणे.	१०८७९८१	१०८८०	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	७६९	श्री. आदेश गजभिये ९६८९९४६५४८
७	पी.एम.सी./भवन/ २३/२०२३-२४	भवन रचना विभाग	राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पुणे मनपाच्या कार्यक्षेत्रामधील स. नं. १६४ बाणेर आरोग्य केंद्र येथील आरोग्यवर्धिनी कार्यान्वित करणेकामी दुरूस्ती विषयक कामे करणे.	१०९४२६८	१०९४३	३ महिने (पावसाळा कालावधी सह)	७६९	श्री. आदेश गजभिये ९६८९९४६५४८

अ) पुणे मनपा ची वरील कामे ही अनुभवी / मनपा मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग पुणे मनपा येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि) / ३२ दि. २२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

(स्वाक्षरी-/)
कार्यकारी अभियंता
भवन रचना कार्यालय, पुणे महानगरपालिका